
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५८ वे, अंक २रा, मुंबई । एप्रिल २०२५
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 58, Issue : 2, Mumbai I April 2025
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

## महिला दिन २०२५






देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५८वे, अंक २रा,
एप्रिल २०२५
(फक्त सभासदांसाठी)

**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९

अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही

दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


# महिला दिन समारंभ










MF
क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

Ravindra Deshpande

REC

RASHMI
ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

# महिला दिन उत्साहात साजरा

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे दि. १६ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात ज्ञातीतील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नाशिक संस्थेच्या पदाधिकारी आणि प्रसिद्धउद्योजिका सौ. अलका मुंकुद कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भुषविले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी, अध्यक्ष श्री. महेंद्र गंधे, सदस्य गिरीश कुलकर्णी, उद्योगपती व नाशिक संस्थेचे अध्यक्ष श्री. मुंकुद कुलकर्णी, श्री. माधव जोशी हे आवर्जून उपस्थित होते. मध्यवर्ती संस्थेमार्फत ज्ञातीतील महिलांचा संस्थेमार्फत सत्कार करण्यात आला. यामध्ये १) डॉ. उज्वला मेंदळे उत्तम लेखिका असून दिल्लीत पार पडलेल्या साहित्य संमेलनात त्यांचे एक पुस्तक प्रकाशित झाले आहेत. २) जी. एस. टी विभागाच्या जॉईंट कमिशनर आणि उत्तम लेखिका ज्यांची अनेक पुस्तके आणि साहित्य प्रकाशित झाली आहेत अशा सौ. स्वाती काळे ३) डॉ. शीतल धर्माधिकारी या उत्तम गायिका असून ज्येष्ठ गायक माणिक वर्मा यांची गाणी घेऊन पी. एच. डी पदवी मिळवली आहे. या संगीत शिक्षिका असून नवोदित मुलामुलींना गाण्याचे वर्ग आणि शिक्षण देतात. ४) ॲड. मुग्धा पांडे या युनिर्व्हसिटी लंडन येथून एल.एल.बी ची पदवी मिळवली असून त्या ॲड. महेश जेटमलानी यांच्या सोबत काम करीत आहेत. लहान वयात त्यांनी हे यश संपादन केले आहेत. ५) सौ. मोनिका चौधरी छ. संभाजीनगर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाच्या अध्यक्षा असून 'नाते मनाचे' या माध्यमातून वधूवर मंडळ देखील चालवित आहेत. ६) सौ. श्रुतिका कुलकर्णी, हरिदास या कल्याण संस्थेच्या सभासद असून योग पंडीत अभ्यासक्रम पूर्ण केला असून योग प्रचार व प्रसाराचे कार्य करीत आहेत. ७) सौ. स्वरूपा इनामदार या बेळगाव (कर्नाटक) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेच्या माजी अध्यक्षा साहित्य भूषण पुरस्कारांच्या मानकरी आहेत. ८) सौ. अल्का मुकूंद कुलकर्णी या नाशिक येथील प्रसिद्धउद्योजिका असून नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी सदस्य म्हणून कार्य करीत आहेत. ९) सौ. प्रणाली कापसे, कुलकर्णी या पत्रकार क्षेत्राात कार्यरत असून टी.व्ही ९ या प्रसिद्धचॅनेलमध्ये पत्रकार म्हणून काम करतात. पूर्वी त्यांनी ए.बी.पी माझा या चॅनेलमध्ये देखील पत्रकार म्हणून कार्य केले आहेत. १०) सौ. हर्षदा पांडे या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर कार्यक्रम करीत असतात आणि सल्लागार म्हणून ठाणे येथे कार्यरत आहेत. उत्कृष्ट सूत्रसंचालन याचा हातकंडा आहे. ११) डॉ. प्राजक्ता कुर्डुकर या एम.डी पॅथोलॉजी या विषयाच्या तज्ञ असून स्त्रीयांची आरोग्य तपासणी या विषयावर त्यांचा सखोल अभ्यास आहे. १२) अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ संस्थेच्या कार्यालयात कु. कोमल अशोक उनवणे आणि सौ. उर्मिला पंकज तांबे या समर्थपणे कार्यालयाचा भार संभाळीत आहेत त्यासाठी त्यांचाही गौरव या 'महिला दिनी' करण्यात आला. या समारंभात श्री. दिपक कुर्डुकर यांनी मध्यवर्ती संस्थेला मदतीचा १ लाखाचा धनादेश संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी यांच्याकडे सुपूर्त केला. या गौरव सोहळ्यानंतर दुसऱ्या सत्रात विविध संलग्न संस्थामधील महिलांनी गुणदर्शनपर कार्यक्रम सादर केला. यात कल्याण, मुलुंड, डोंबिवली, गिरगांव आदी संस्थामधील महिलांनी नृत्य, गायन, कवितावाचन, एकपात्री प्रयोग, भारूड असे विविधांगी प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. जागतिक महिला दिन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यवाह सौ. रोहिणी रामचंद्र तडवळकर, सौ. ज्योती माधव जोशी, सौ. सुनिता दिलीप रोझेकर, सौ. केतकी कौस्तुभ कुलकर्णी, ॲड. मंजिरी शरद पारसनीस, सौ. मीनल महेंद्र गंधे यांनी प्रयत्न केले. उपस्थित महिलांना भेट वस्तू देऊन दोन सत्रामध्ये आखलेल्या कार्यक्रमाची सांगता झाली.

# समर्थांना अभिप्रेत असणारी नाम साधना

**स.भ. मोहनबुवा रामदासी (मो. : ९१४६८५५६९१)**

समर्थांच्या जीवनात त्यांनी देव, देश व धर्म याबद्दल समाजात चैतन्य व स्फुर्ती निर्माण करण्याचे कार्य केले. एखाद्या सामान्य व्यक्तीला परमेश्वर प्राप्ती कशी करुन घेता येईल यावरच समर्थ रामदास स्वामींचा भर राहिला. परमेश्वर प्राप्तीसाठी नऊ मार्ग किंवा नऊ पायऱ्या त्यांनी आपल्याला सांगितल्या आहेत. नवविधा भक्ती असे आपण त्यांना जाणतो. श्रवण, कीर्तन, नामस्मरण, वंदन, अर्चन, पादसेवन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन अशा या ईश्वर प्राप्तीच्या पायर्या होय. यापैकी नामस्मरण भक्ती याविषयी आज आपण पाहणार आहोत.नामस्मरण म्हणजे भगवंताचे अखंड चिंतन! आपल्याला ज्ञात अशा अनेक संतांनी नामस्मरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. श्री समर्थ रामदास स्वामी, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ आणि संत ज्ञानेश्वर यांनी वारंवार नामस्मरणाचे महत्त्व पटवून दिले आहे. नामस्मरणभक्ती या समासातील ओव्यांमध्येही नामस्मरण हे जीवनातील प्रत्येक स्थितीत कसे आवश्यक आहे, यावर भर देण्यात आला आहे. मनुष्याच्या जीवनाच्या प्रत्येक क्षणी नामस्मरण हे आवश्यक असतेच. पुढील ओव्यांमध्ये स्पष्ट सांगितले आहे की,चालतां बोलतां धंदा करितां। खातां जेवितां सुखी होतां ।। या प्रत्येक स्थितीतही भगवंताच्या नामाचा विसर पडू नये. कारण भगवंताचे नाम जिथे असते, तिथून संकटेही नाहीशी होतात. तसेच, आपले मन स्थिर राहते आणि चंचलता दूर होते. नामस्मरण फक्त दुःखात असताना करू नये. अनेकांना जेंव्हा संकट येते तेंव्हाच देवाचे नाव मुखात येते. पण श्री समर्थ म्हणतात की आपण सुखात किंवा दु:खात दोन्ही स्थितीत नाव विसरू नये. जीवनात सुख असो किंवा दुःख, संकट असो किंवा वैभव, कोणत्याही परिस्थितीत संपत्ती अथवा विपत्ती। जैसी पडेल काळगती ।। असे असले तरी नामस्मरणाची सवय कधीच सोडू नये. कारण संकटांमध्ये नाव घेतल्याने संकटे दूर होतात आणि वैभवात नाव घेतल्याने अहंकार राहात नाही. अनेक संतांनी याचा अनुभव घेतला आहे. श्री समर्थांना याची प्रचिती आलेली होती आणि म्हणूनच त्यांनी नामस्मरणावर विशेष भर दिला आहे. हे नामस्मरण म्हणजे समाधानाचा एक मार्ग आहे. जीवनात नित्य-नेमाने भगवंताचे नाव घेतले, तर त्यातून समाधान लाभतेच नामस्मरणें पावावें। समाधान ।। असे ओव्यात सांगितलेच आहे. हा समाधानाचा मार्ग आहे. भगवंताचे नाव घेतल्याने मन शांत राहते. माणसाच्या जीवनातील ताण-तणाव दूर होतात. त्यामुळेच, घरातील लहान-मोठ्या प्रत्येकाने नामस्मरणाची सवय लावून घ्यावी. संकटांवर व प्रपंचातील सर्व खटपटींवर सुद्धा नाम हाच एक तोडगा आहे. या नामानेच नाना संकटे, भुतं-पिशाच्च दूर होतात. संसारातील संकटे असोत, वाईट विचार असोत किंवा मानसिक अस्थिरता असो, त्यावर नामस्मरण हाच उपाय आहे. समर्थांनी पुढे म्हटले आहे की,

नामें संकटें नासतीं। नामें विघ्नें निवारती ।। त्यामुळेच, नामस्मरण केल्याने मनाला शांतता मिळते आणि संकटे दूर होतात. वाईट शक्ती आणि अपायकारक ऊर्जा आपल्यापासून दूर राहतात. हे नामस्मरण म्हणजे ईश्वराची कृपा मिळवण्याचा सोपा मार्ग संतांनी नामस्मरणाचा उपदेश करून आपल्याला सुटसुटीत मार्ग सांगितला आहे. ग्रंथवाचन, तपश्चर्या, कठोर साधना यासाठी वेळ देणे प्रत्येकाला जमतेच असे नाही. पण, नामस्मरण करण्यासाठी कोणत्याही विशेष तयारीची गरज नाही. त्यामुळे संतांनी सांगितले आहे की, विश्रांतिकाळीं निद्राकाळीं। नामस्मरण करावें ।। याचा अर्थ असा की, झोपण्यापूर्वी आणि उठल्यावरही नामस्मरण केले पाहिजे. नामस्मरणामुळे आपला आत्मविश्वासही वाढतो. आपण सतत देवाच्या सानिध्यात असल्याची जाणीव आपल्या

मनात तयार होते. सतत भगवंताचे नाव घेत राहिल्यास मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. स्वतःवरचा आणि भगवंतावरचा विश्वास दृढ होतो. त्यामुळे कठीण प्रसंगांमध्येही माणूस खचून जात नाही. जीवनात आत्मविश्वास टिकून राहण्यासाठी नामस्मरण हा सर्वांत उत्तम मार्ग आहे. ईश्वराच्या नामस्मरणामुळे चित्त शुद्ध होते. मनात व ओठांवर देवाचे नाव असेल तर आपले मन एकाच जागी बांधलेले राहाते. सतत नामस्मरण केल्याने माणसाचे चित्त शुद्ध होते. वाईट विचार दूर होतात आणि जीवनात सात्त्विकता वाढते. संतांनी सांगितले आहे की, नामस्मरणाने अंतःकरण निर्मळ होते आणि त्यामुळे जीवनात शांती आणि समाधान मिळते. नामस्मरण हे केवळ एक कर्म नाही, तर ते परमेश्वराची कृपा मिळवण्याचा सहज, सोपा आणि प्रभावी मार्ग आहे. वरील ओव्यांमध्ये त्याचाच उपदेश आहे. सुख-समृद्धी, शांती आणि भगवंताची प्राप्ती हवी असेल, तर नामस्मरण हाच सर्वांत सोपा उपाय आहे. आपण रोजच्या जीवनात हे साधन करायला हवे, कारण ते आपल्या मनाला शांत, प्रसन्न आणि आनंदी बनवते.

## रोगनिदानाच्या पायऱ्या

**डॉ. नीरज रायते (मो. : ९९२२४२७०६७)**

रोगनिदान करण्याच्या प्रक्रियेत सुसूत्रता यावी.... रोगनिदान योग्य व्हावे आणि त्यामुळे उपचार सुयोग्य व्हावे. निदान, उपचार आणि परिणती याविषयी विश्वासार्हता असावी यासाठी वैद्यकशास्त्राने आजाराच्या अभ्यासाच्या विशिष्ट पायऱ्या ठरविल्या आहेत. रुग्णाची मूलभूत माहिती, लक्षणांचा सुसूत्र अभ्यास, शारीरिक तपासणी, प्राथमिक 'रोगनिदान, प्रयोगशालेय विशेष चाचण्या आणि अंतिम अनुमान असा पायरी पायरीने शोध घेत कुशल डॉक्टर रोगनिदान करीत असतात. प्रत्येक पायरीवर रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकांनी दिलेली माहिती, डॉक्टरांनी केलेली शारीरिक तपासणी आणि रोगचिन्हांचा अभ्यास आवश्यक आहेत. प्रयोगशालेय चाचणीचे निष्कर्ष एकत्रित करुन रोगनिदानाची प्रक्रिया पूर्ण होते म्हणूनच या प्रक्रियेत सर्वांचा उत्कट सहभाग महत्त्वाचा असतो.

रुग्णाचे नाव, पत्ता, वय, राहण्याचे ठिकाण, व्यवसाय, मासिक उत्पन्न, आर्थिक स्थिती कशी आहे ही मूलभूत माहिती जरी संबंधित क्लार्क घेत असले तरी ही सर्व माहिती महत्त्वाचीच असते. रुग्णांचे नाव नातेवाईकांचे संपर्क क्रमांक माहिती असणे हे डॉक्टर-रुग्ण सुसंवादाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. आवश्यक ती सर्व माहिती डॉक्टरांना आपणहून सांगणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे तपासणीच्या वेळी एखाद्या जबाबदार नातेवाईकांची उपस्थिती अपेक्षित असते आणि ती उपकारक ठरते. हा सुसंवाद, ही आत्मीयता, हा जिव्हाळा अनेक समज, गैरसमज टाळण्यास उपयोगी पडतो. अलीकडे, डॉक्टर-रुग्ण स्नेहसंबंध दुरावले आहेत, पण पूर्वी डॉक्टर हे प्रत्येक कुटुंबाचे अविभाज्य घटक असायचे. रुग्णाशी असलेला वैयक्तिक परिचय, रुग्णाविषयी जिव्हाळा, आत्मीयता हा तर सफल वैद्यकीय व्यवसायाचा आत्मा आहे. परस्परांविषयी वाटणारा आदर, स्नेह, सहानुभूती, श्रद्धा, निष्ठा आणि परस्परांचा एकमेकांवरील विश्वास या गुणांच्या आधारेच या व्यवसायाला उच्च स्थान लाभले आहे.

म्हणूनच आज डॉक्टर-रुग्ण संबंध हा महत्त्वाचा प्रश्न बनला आहे. ग्राहक संरक्षण कायद्यामुळे रुग्णांचे अधिकार अधिक स्पष्ट झाले आहेत. रुग्णाच्या आजाराविषयी संपूर्ण माहिती घेणे, उपचाराचे नियोजन करणे त्याविषयी रुग्णांना माहिती देणे, त्याची ऑपरेशनपूर्वी अनुमती घेणे, अशा अनेक गोष्टी आता कायदेशीरदृष्ट्या

महत्त्वाच्या झाल्या आहेत. नियोजनातील त्रुटीचा, अभावाचा गैर फायदा घेऊन, गैरसमज करुन घेऊन डॉक्टरांवर विनाकारण खटले भरण्यात येतात. तसेच त्यांच्यावर हल्ले करण्यात येत आहेत. हे थांबले पाहिजे. आपल्याकडे आलेला रुग्ण आपलाच नातेवाईक आहे, स्वकीय आहे, आप्त आहे, त्याच्या उपचारात काहीही त्रुटी राहू नये अशी खबरदारी जर प्रत्येक डॉक्टरांनी घेतली तर भारताची आरोग्यव्यवस्था जगापुढे आदर्श ठरेल.

## संघाची सामाजिक चळवळ डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी

**डॉ. मनोहर सालफळे** (मो. : ९८६९११२९७२५)

पैसा पेढीत ठेवला की वाढतो. एक सुरक्षितता वाढते, म्हणून पत पेढीत स्वत:हून ठेवले जातात. रक्तही दिले की वाढते. रक्ताचे नाते समाजाशी जुळते. त्यामुळे अनेकांची जीवने सुरक्षित होऊ शकतात. हा विचार करून प्रत्येकाने निदान वर्षातून एकदा स्वत: रक्तदान करावे. आपल्या सर्व मित्रांना व नाते वाईकांना रक्तदानाची प्रेरणा द्यावी. हा विचार प्रत्यक्षात आणणाऱ्या डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी स्थापन करण्यात आली. १९९२ मध्ये सन्मित्र सभा या संस्थेने पाच हजार ऐच्छिक रक्त दात्याची एक सूची प्रकाशित केली या प्रकाशना पूर्वी संस्थेने परम पूज्य बाळा साहेब देवरस यांच्या शुभ आशीर्वादाने काही रक्त गत तपासणी शिबिरे आयोजित केली होती. यातूनच एक स्वयंसेवी स्वयंपूर्ण व सेवा भावी पत पेढीची स्थापना करावी अशी कल्पना समोर आली. बाळा साहेबांनी अनुमित दिल्या नंतर रक्तपेढीचे नाव डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी असे ठरले. डॉक्टर आबाजी थत्ते यांना रक्तपेढी स्थापनेची कल्पना समजल्यावर ताबडतोब त्यांनी स्थापणे पूर्वीच दहा हजार रुपये राशीचा धनादेश अनुदान म्हणून देऊन प्रोत्साहन दिले.

सेवा भाव आणि समर्पणाच्या भावनेने एखादे कार्य हाती घेतले की, समाज पुरुष नेहमी सहकार्याचा हात देतो. ९ मे रोजी बाळा साहेब देवरस यांच्या आशीर्वादाने डॉक्टर हेडगेवार रक्तपेढीचा प्रारंभ झाला. रक्ता अभावी कुणालाही मृत्यू येऊ नये ही या रक्त पेढीचे घोष वाक्य आहे. स्वस्थ समाजाचे रक्त रूग्ण समाजाकडे प्रवाहित करणारी विश्वसनीय संस्था म्हणजेच डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी असा विश्वास जनतेच्या निर्माण झाला आहे. समाजाच्या सुख दु:खात सहभागी होत असतानाच आम्ही या नया नफा ना तोटा तत्वावर चालणाऱ्या समाज कार्यासाठी समाजाचेच सहकारी घेतले आहे. डॉक्टर हेडगेवार रक्तपेढीचे कार्य समाजाच्या सहकार्यावर, जनतेच्या अनुदानावर उभे आहे. समाजाचा आमच्यावरचा, आमच्या कार्य शैलीवरचा विश्वास ही एकमेव भांडवल आहे. समाजा कडून प्राप्त होणार्या मोठ्या देणग्यांवर सुकाणू समितीचे नियंत्रण आहे. या शिवाय सर्व आर्थिक व्यवहाराचे वार्षिक अंकेशन केले जाते. कर्मचार्यांचा सहभाग व आपले पणाची भावना यामुळे येथील वातावरण खेळीमेळीचे व आपुलकीचे आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार केवळ शाब्दिक वा प्रचारकी थाटाचे नाहीत.. ती एक आदर्श जीवन शैली आहे. संघाच्या स्वयं सेवकाकडून समाजाच्या अपेक्षा, त्यांची विश्वासा हर्ता हा संघ विचारांचा पाया आहे. कार्यकर्त्यांच्या आचरणाचा आदर्श हाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा खरं प्रचार आहे. डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रत्यक्ष नियंत्रणात नाही. संघ विचारांचा आदर्श निर्माण करणारे आहे. जन्मदिनी रक्तदान हा या रक्त पेढीचा अत्यंत लोकप्रिय ठरलेले उपक्रम आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यकर्त्यांनी जन्मदिनी रक्तदान यावर रक्तदानाच्या रक्ताच्या थेंबांचे महत्त्व सांगणारे एका कवितेच्या ओळी लिहल्या. बूंद है इसका मोती जैसा । न मिलता ये दे कर पैसा।।

तसेच एका स्वयंसेवकाने रक्त दाना बाबत खालील घोषणा लिहल्या.

१) अठरा नंतर मतदान । जन्म तिथीला रक्तदान।।

२) संकल्प करू या जन्म दिवसा। रक्तदानाचा घेऊ या वसा।।

३) जन्म दिन असे आनंदाचा । निश्चय माझा रक्त दानाचा।।

४) जन्म तिथीला करू संकल्प । रतदाना नसे विकल्प ।।

पाश्चिमात्य देशात साधने पैसा सर्व मिळेल. परतू जन्मदिनी रक्तदानाची कल्पना केवळ भारतातच जन्म घेऊ शकते. ही एका विदेशात स्थाईक झालेल्या भारतीयांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया याबाबत विलक्षण बोलकी आहे. तसेच जन्मदिनी रक्तदान जरूर करा । व्यवसायी रक्त दाता दूर करा।। ही घोषणा या रक्त पेढीचा उद्देश स्पष्ट करणारी आहे. नाना महाराज तराणेकरांनी संदेश पाठवविला. त्यात ते म्हणाले की सेवाधर्म ही अत्यंत श्रेष्ठ आहे. ईश्वरी कार्य आहे. या ईश्वर निर्मित (रक्त) मौल्यवान पदार्थांचा वापर. व्याधींनी ग्रस्त अश्या जीवांना उपलब्ध करून देऊन. त्या ग्रस्त जीवांना जीवन जगण्याचे सुख व आनंद देण्याचे फार मोठे मोलाचे सेवा कार्य आपण स्वीकारले आहे. डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीचा थयालेसेमिया प्रकल्प अश्या व्याधींनी ग्रस्त जीवांना दिलासा देणारा व त्यांना जगण्याचे सुख व आनंद देणारा आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जेष्ठ अधिकारी सूर्य नारायण राव यांनी आम्हाला व्यावहारिक वेदांत सांगीतलं आहे. समाज बांधवो की कमियो को दूर करणे के लिपे नि स्वार्थ भावसे सेवा करनेवालो मन परिशुद्ध बनता है. एक प्रकारका दैवी अलोलीक आनंद अनुभव मे आता है. इस प्रकार मनुष्य देवत्व की पुर बढता है. यही व्यवहारी क वेदांत है. यही व्यावहारिक वेदांत है. डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीने सिकल सेल प्रकल्प गांभीर्याने घेतला असून याबाबत मार्गदर्शन व निदान केंद्र सुरू केले आहे. या सर्व प्रयत्नांचा परिणाम असा


JV MARKETING & INVESTMENTS
*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* *+91 98330 25031*
*MBA - Marketing* *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

की डॉक्टर हेडगेवार रक्तपेढी हे जन माणसात विश्वासार्ह असे प्रथम क्रमांकाचे नाव झाले. सामाजिक उत्सव व सणवार, सामाजिक समरसता अश्या विविध स्तरांवर घोष वाक्ये परिणाम कारक ठरली आहेत.

१) बंधुस राखी बांधू या । रक्तदानास नेऊ या।।

२) समाज व्हा वया समरस। रक्तदानाने करा एकरस।।

३) ममतेतून समरसता । रक्तदानाने एक रस्ता ।।

४) तुम्ही आम्ही सकल बंधु । नाते रक्त दानाने साधू ।।

५) संक्रमणांची तारीख चौदा । रक्तदान नसे सौदा ।।

६) होली पुनवेला रंगोत्सव । रक्तदानाने व्हावा जन्मोत्सव ।।

या आणि अश्या घोष वाक्याने डॉक्टर हेडगेवार रक्त पेढीची प्रतिमा उंचावली. या पत पेढीमुळे विविध स्तरावर नाते जुळले आहे. ही विश्वासा हर्ता किती असावे यांचे उदाहरण म्हणजे सलीम जाफरभाई व्यवसायिक असलेले या रक्तपेढीला मानवता मंदिर म्हणतात. सलिम भाईनी ४५ वेळा स्वता रक्त दिले व अन्य ३०० लोकांना रक्त दाना साठी प्रवृत्त केले आहे. ते म्हणतात विश्वास की नीव पर दुनिया चलती है. अछा काम करना भगवान की सेवा है. ही त्यांची भूमिका डॉ. हेडगेवार रक्तपेढी यह एक सामाजिक प्रकल्प है. अन्य रक्त पेढीमे खून का व्यवसाय नजर आता है. अवर यह अपणा पण. मुझे बार बार खिच कर आता हू. हे मनोगत म्हणजे डॉ. हेडगेवार रक्त पेढीचे वेगळे पण दाखवणारे आहे. इथले रक्त आम्हाला चालणार नाही असा पूर्व ग्रह असणार्यांना एखादा मुस्लिम युवक जेव्हा आपल्याबरोबर घेऊन येतो, त्यांच्या वतीने व्यवस्थापकाची माफी मागतो. तेव्हा ती सामाजिक समरसते पणाची पावतीच नसते का?

झाडू पोछा करणारी, सगळ्यांसाठी चहा पानी करणारी गरीब परंतु हसतमुख अशी एखादी बिंडाबाई जेव्हा जास्त पगाराची नोकरी सोडून देते. नि सांगते की मला नाय पायजे जास्त पैका. या मंदिरात पैका मिळते. त्या परिस पुण्य बी लागते. त्या वेळी ती आम्हाला मनुष्याची देवत्व कडे वाटचाल वाटते. रक्त पेढी ज्यांचे वाढत्या व्यापात कधीतरी असे विनोदी किस्से घडतात. त्या वेळी आबाजी थत्ते यांची आठवण येते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्वार्थाने ज्यांचे नाव आम्ही घेतले आहे. त्यांच्या प्रमाणे अत्यंत शुद्ध रक्त आम्ही पुरवितो. रक्त पेढीची एक पिशवी ही समाजातील एका दात्यापेक्षा कितीतरी सरस असते. या विचारांचा आम्ही प्रसार करतो. ईश्वरी आणि सेवा भावी कार्याच्या जाणिवेतून ही वाटचाल सुरू आहे, व पुढेही सुरूच राहील. संघाचे ही एक समरस ता व समजाशी बांधीलकीच नाही का?

## संलग्न संस्था वृत्त

* **धुळे :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ धुळे व श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान धुळे तर्फे काल मंदिर सभागृहात एकनाथ षष्ठी निमित्ताने संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित सुपरिचित प्रवचनकार सौ रेवती पागे यांचे एकनाथ महाराज जीवन चरित्रावर प्रवचन संपन्न झाले. या प्रसंगी त्यांनी आपल्या प्रवचनातून संत एकनाथ महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित अनेक प्रसंग उलगडून सांगितले व एकनाथी भागवत निर्मिती , महाराजांचे पैठण संदर्भातील माहात्म्य, रुक्मिणी अष्टक, एकनाथ महाराजांचे लोककल्याणकारी व सामाजिक प्रबोधन कार्य, त्यांचे लेखन कार्य आदी अनेक महत्त्वाच्या विषयांवर आपल्या प्रवचनातून प्रकाशझोत टाकला. या प्रसंगी प्रवचनकार सौ रेवती पागे, श्री गणपुले दत्त मंदिर संस्थान च्या च्या अध्यक्षा धनश्री ताई गरुड, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ महिला आघाडी संयोजक सौ रेणुका पेटारे, व्यासपीठावर उपस्थित होत्या.

प्रारंभी संत एकनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन माल्यार्पण करण्यात आले व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला, सौ रेवती पागे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सौ सुचेता रुद्र यांनी सूत्रसंचालन केले, सौ सुषमा पुरोहित यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला, सौ संध्या कुलकर्णी यांनी आभार मानले. समारोप प्रसंगी महा आरती करण्यात आली व नंतर काल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.

* **सोलापूर :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या वतीने दासनवमी निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतलेल्या पाठांतर स्पर्धेतील बक्षीसांचे वितरण डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते संस्थेच्या सभागृहात झाले. यावेळी. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, विजय कुलकर्णी, कार्यवाह श्याम जोशी, खजिनदार सतीश पाटील, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य शंकरराव कुलकर्णी, रविंद्र तुळजापूरकर, सुनिल माढेकर आदीसह स्पर्धक विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र तर सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. डॉ. येळेगावकर यांचेही यावेळी भाषण झाले. यादी वाचन सुशांत कुलकर्णी यांनी केले. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. दत्तात्रय आराध्ये यांनी आभार मानले.

* देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणउत्तेजक संस्था व ल.गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन सोलापूर तर्फे सरस्वती चौक येथील सेवासदन प्रशालेत युवती देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणउत्तेजक संस्था व ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन सोलापूर तर्फे सरस्वती चौक येथील सेवासदन प्रशालेत युवती प्रबोधन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात युवती साठी उद्योगाच्या संधी या विषयावर जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी श्री राजशेखर शिंदे यांना आमंत्रित करण्यात आले होते. करियर घडविताना ध्येय आणि दिशा निश्चित केली पाहिजे यशाकडे जाण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून कौशल्य विकसित केली पाहिजे ज्ञान व




Protect Capital & Create Wealth.....

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured.....

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance Specialist

एकाग्रतेच्या सहाय्याने उद्योगांमध्ये उतरून महिलांनी आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊन सक्षम समाजासाठी योगदान द्यावे असे श्री राजशेखर शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, काकडे फाउंडेशनच्या अलका काकडे उपस्थितीत होते. अध्यक्ष स्थानी महिला शाखेच्या अध्यक्षा कु.हेमा चिंचोळकर होत्या. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक डॉ.नभा काकडे यांनी केले. रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. आभार क्षितीजा गाताडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.शुभदा कुलकर्णी यांनी केले. प्रबोधन शिबिरामध्ये अलका काकडे व मानसी कुलकर्णी यांनी बौद्धिक गेम्सद्वारे युवतींना मानसिक आरोग्याचे ज्ञान दिले. डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी वाचनसंस्कृती विकसीत करण्यासाठी प्रबोधन केले. क्षितीजा गाताडे यांनी कागदी फुले व हार तयार करण्याचे हस्तकला कौशल्याचे प्रशिक्षण दिले तर समारोपाच्या अखेरच्या सत्रात अॅड. मंगला जोशी (चिंचोळकर) यांनी महिला विषयक कायद्याची माहिती दिली. सत्तर युवतीं व वीस महिलांनी या प्रबोधन शिबीराचा लाभ घेतला. कार्यक्रमास ल.गो.काकडे एज्युकेशनल फौडेशनचे संचालक अॅड. अनिल काकडे दे.ऋ.ब्रा.संस्थेचे उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतिश पाटील, युवक शाखेचे अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, वासंती येळेगावकर, विदुला कुलकर्णी, संगिता कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

* **मुलुंड :** मुलुंड येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थे मध्ये गुरूवार दिनांक २० मार्च रोजी श्री नाथ षष्ठी सोहळा संपन्न झाला. त्यावेळी ह.भ.प.सौ.साधना केळकर यांचे सुश्राव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते. नाथ षष्ठीचे महत्त्व तसेच नाथा न चे त्यांचे गुरू श्री जनार्दन स्वामी यांच्याशी झालेली भेट, नाथा नी रचलेले भारुड, गवळणी, अभंग सांगून संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराज यांची महती सांगितली. सौ साधना ताई यांना सौ जान्हवी मराठे यांनी तबल्यावर तर अनिता श्रौती यांनी पेटीवर सुरेल साथ दिली. शेवटी आरती झाल्यावर सर्वांना पेढ्याचा प्रसाद आणि कॉफी देण्यात आली.कार्यक्रमाला ८० जणांची उपस्थिती होती.अशा रीतीने मुलुंड संस्थेमध्ये नाथषष्ठी उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

* **कल्याण :** जागतिक महिला दिन दरवर्षीप्रमाणे ०९ मार्च २०२५, रविवारी, कल्याण महिला मंडळ, सभागृह बाजारपेठ कल्याण,(प) येथे सायंकाळी पाच ते आठ यावेळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बहुसंख्येने सर्व थरांतील महिला सदस्य, हितचिंतक सहभागी झाले होते. यावेळी स्त्री शक्तीचा जागर, विविध क्षेत्रात अभिनव कामगिरी केलेल्या तसेच नुकतेच वय वर्षे ७० पुर्ण करुन एकाहतरीत प्रवेश केलेल्या जेष्ठ व श्रेष्ठ महिलांचा सन्मान करण्यात आला.

सत्कार मूर्ती खालील प्रमाणे :

१) सौभाग्यवती सीमाताई लक्ष्मण सरदेशपांडे, वय वर्षे ७० पूर्ण. २) नुकत्याच नाशिक येथे झालेल्या योग शिक्षा वर्गातील योग पंडित सौभाग्यवती श्रृतिका सतिश कुलकर्णी. ३) तसेच कलारत्न पुरस्कार प्राप्त तरुण आजीव सदस्या सौभाग्यवती अजिता घोडगांवकर/निरंतर. ४) संस्थेच्या उपाध्यक्षा यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मी व्यंकटेश देशमुख वय वर्ष ७४. ५) सौभाग्यवती अजिता घोडगांवकर यांच्या सासुबाई श्रीमती रजनीताई घोडगांवकर वय वर्षे ७०+. ०६) सौभाग्यवती विद्याताई इंगळे यांचा आज जन्मदिन होता. ०७) तरुणांच्या आकर्षण असलेल्या तरुण सदस्यां सौभाग्यवती ऋतुजा निखिल जोशी.

या महिला मान्यवरांचा सन्मान संस्थेतील जेष्ठ व श्रेष्ठ महिला सदस्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कल्याणकर तसेच इतर सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यात प्रामुख्याने १) आनंदी महिला मंचच्या अध्यक्षा सौ लता पालवे, २) कल्याण महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ रेखाताई कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते, त्यांचा पुष्प गुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यानंतर उपस्थित महिलांनी

विविध प्रकारचे सांस्कृतिक, शैक्षणिक, माहिती असे कार्यक्रम नाट्य अभिवाचन, कविता वाचन, योगाची प्रात्यक्षिके, एकपात्री प्रयोग, देवीची स्तुतीपर गाणी/जागर, याव्दारे सादर केले तसेच महिला सदस्यांचे सुंदर पोटधरून हसविणारे विनोद/अभिनय, याचबरोबर प्रयाग राज महा कुंभमेळ्याचे सुंदर वर्णन सौ. श्वेता धवल ग्रामोपाध्याय यांनी केले. तसेच महिलांना रोज जीवनात उपयोगी पडतील अशा महत्त्वाच्या पण सोप्या टिप्स देण्यात आल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष, कार्यवाह, उपाध्यक्षा व कल्याण पुर्व कार्यालय प्रमुख इतर कार्यकारणी सदस्य आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी श्री रमेश पालकर, श्री जितु कांबळे, सौ शुभांगी कुलकर्णी, श्रीमती बहुलेकर, सौ मुग्धा घाटे, सौ गिताई काळकर, सौ माया देवभानकर, सौ मेघा पुणतांबेकर व समस्त महिला आघाडी च्या कार्यकारणी सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अधिवक्ता सौ कोमल कुलकर्णी व सौ शुभांगी कुलकर्णी यांनी केले. आभार प्रदर्शन सौ माया देवभानकर यांनी केले. त्याच्यानंतर लोकमान्य मल्टीपर्पज सहकारी पतसंस्था कल्याण शाखेकडून तीन लकी ड्रॉ काढून तीन जणींची नावे जाहीर करण्यात आली. सुरवात चहापान व शेवट खानपाना नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

* **वडोदरा** : दिनांक २/४/२०२५, बुधवार रोजी,देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळाचा वडोदरा वर्धापनदिन मंडळाच्यावा कार्यालयात थाटामाटात पार पडला. या प्रसंगी श्री सत्य नारायण पूजा आयोजित केली होती आणि त्याचे पौरोहित्य मंडळाचे सभासद श्री राजीव सुरतकर यांनी उत्तम रीत्या सांभाळले. यजमानपद मंडळाचे सक्रिय कार्यकारिणी सदस्य श्री प्रताप रांजणगावकर आणि त्यांच्या धर्मपत्नी सौ. मंगलाताई रांजणगावकरांनी भूषवीले. मंडळाची स्थापना २/४/१९६७ रोजी झाली होती आणि तेव्हापासून समाजातील गरजू व्यक्तींच्या उपयोगी उपक्रमांसकट ब्राह्मण संस्कृतीचे जतन, रीतीरिवाज आणि त्याचे पालन तसेच महिला सशक्तीकरणाचे कार्यक्रम मंडळ योजित आले आहे. मंडळाने नुकताच आयोजित केलेला मुंबईचा संगीत कार्यक्रम 'मर्म बंधातली ठेवही'च्या भरघोस यशानंतर आपली संस्था लाईम लाईटमधे आली आहे आणि वडोदरामधील तमाम ब्राह्मण समाजाचं लक्ष वेधून घेतले आहे. श्री सत्यनारायण पूजा आणि दर्शनाला सभासदांनी उस्फूर्त प्रतिसाद देवून अधिक संख्येने उपस्थित होते आणि प्रासंगिक देणग्या दिल्या. सुमारे सव्वाशे ते दिडशे जुन्या नव्या सभासदांनी एकत्रितपणे येवून कार्यक्रमाची शोभा वाढवली आणि मेंबरशिपमध्ये भर घातली.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे ..........................................................................................**

* **अंकुर विनायक पांढरकर (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** १४/०५/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ८.१८, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** गरग्या, **रास :** कर्क, **नक्षत्र :** अश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** आयटी आय, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** ३लाख ५०हजार, **अपेक्षा :** समंजस, अनुरूप, **संपर्क :** ९८१९६७७७९३/९८६९०६५७७७

* **रिध्देश श्रीकांत दाणी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०६/०९/१९९७, **जन्म वेळ :** सकाळी ११.४५, **जन्म ठिकाण :** जळगाव, **उंची :** ५.९, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** मौन भार्गव, **रास :** तुळ, **नक्षत्र :** चित्रा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. टेक.एम. बी. ए, **नोकरी/ व्यवसाय :** मॅनेजर रिलायन्स इंडस्ट्रीज (नवी मुंबई),

मुलाला सौम्य आणि निर्दोष मंगळ आहे, मुलाला शास्त्रीय संगीताची आवड आहे, स्वत: तबला वादन करतो, **वार्षिक उत्पन्न :** १०.५०लाख, **अपेक्षा :** समंजस, सुस्वभावी, अनुरूप, मनमिळावू, किमान पदवीधर, शांत, सश्रध्द, संगीताची आवड असल्यास उत्तम, **संपर्क :** ९०२२५४१७५६/९०२१८३९०२२

**※ साईप्रसाद प्रभाकर कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ११/०२/१९८९, **जन्म वेळ :** सकाळी ७.५९, **जन्म ठिकाण :** सांगली, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** मेष, **नक्षत्र :** अश्विनी, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** Axtrics Solution Pvt Ltd. मोहाली पंजाब, **वार्षिक उत्पन्न :** ११लाख, **अपेक्षा :** समंजस, सुस्वभावी, अनुरूप, मनमिळावू, मुलगी नोकरी करणारी, पदवीधर, कोणत्यारी ब्राह्मण शाखेतील असावी, **संपर्क :** ९७६९४९७०८८

**※ पार्थ संदीप कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/०३/१९९८, **जन्म वेळ :** सकाळी ७.५०, **जन्म ठिकाण :** विजयपुरा, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** वसिष्ठ, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** पुनर्वसू, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी.एस. सी., एम. बी. ए, एचआर, **नोकरी/ व्यवसाय :** स्वत:चे रिसॉर्ट मामनोली कल्याण जवळ आहे, **वार्षिक उत्पन्न :** १८लाख, **अपेक्षा :** समंजस, अनुरूप, **संपर्क :** ८९२८८२३०८०/ ८४२२९३३९१५

**※ केतन सदानंद जोशी (देवरूखे ब्राह्मण), जन्म तारीख :** ०८/०९/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ६.४३, **जन्म ठिकाण :** रत्नागिरी, **उंची :** ५.५, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मिथुन, **नक्षत्र :** पूनर्वसु, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. ई मेकॅनिकल, **नोकरी/ व्यवसाय :** विजय इंजीनियरिंग अँड मशिनरी कंपनी तळोजा, **वार्षिक उत्पन्न :** ७.८लाख, **अपेक्षा :** अनुरूप, वार्षिक उत्पन्न ५-६लाख, इंजीनियरिंग पदवीधर, एमबीए, एमसीए, वयातील अंतर ०-२वर्ष, शाखा - कोकणस्थ, कऱ्हाडे, देशस्थ, देवरूखे, **संपर्क :** ७५५९४१३६९५/ ९४२१५९६५६५

**※ तेजस अरुण कुवळेकर (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २३/०८/१९९४, **जन्म वेळ :** दुपारी ३.३५, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.८, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मीन, **नक्षत्र :** पूर्व भाद्रपद, **नाडी :** आद्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.एस.सी.डिग्री इन हॉटेल मॅनेजमेंट, **नोकरी/व्यवसाय :** किचन सुपरवायझर इन टाटा मेमोरिअल हॉस्पिटल परेल विभाग सेंट्रल गवर्नमेंट जॉब, **वार्षिक उत्पन्न :** ८लाख ४०हजार, **अपेक्षा :** समंजस, सुस्वभावी, उंची ५.२पुढे, वय २७-३० वर्षे, नोकरी करणारी, अनुरूप, मनमिळावू, **संपर्क :** ९९६९००१९३५/९७७३६६१३१६

**※ निखिल किशोर नेने (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०८/१९९३, **जन्म वेळ :** सकाळी ८.५९, **जन्म ठिकाण :** कुर्ला (मुंबई), **उंची :** ५.८, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** विष्णुवृद्ध, **रास :** वृश्चिक, **नक्षत्र :** ज्येष्ठा, **नाडी :** आद्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. इ कॉम्प्युटर इंजीनियर, **नोकरी/व्यवसाय :** Thyssenkrupp India Private Limited, Thane (W), **वार्षिक उत्पन्न :** ६.५०लाख, **अपेक्षा :** समंजस, अनुरूप, नोकरी करणारी, फिरण्याची आवड असणारी (Specify City Also), **संपर्क :** ९८९२६१००७४/७०२१६८७११९

**※ स्वप्नील विजय आठवले (कोकणस्थ ब्राह्मण), जन्म तारीख :** २७/०५/१९९७, **जन्म वेळ :** दुपारी १.००, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.७, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** अत्रि, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. इ, **नोकरी/ व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** १० ते १२लाख, **अपेक्षा :** समंजस, सुस्वभावी, अनुरूप, अंतर १ ते ५वर्ष, **संपर्क :** ९०२९०७३८२८/९९६९१५१०३८

**वर पाहिजे .......................................................................................**

*** शिवानी जितेंद्र कांबळे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०३/०८/१९९७, **जन्म वेळ :** संध्याकाळी ५.२७, अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बीए एलएल बी, एल एल एम, **नोकरी/व्यवसाय :** ॲडव्होकेट, **वार्षिक उत्पन्न :** ४लाख ८०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ९८२०२५४९३६/७७३८३६५४०५

*** यशश्री देवेश इनामदार (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/११/१९९२, **जन्म वेळ :** सकाळी ११.३७, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५.६, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** अत्रि, **रास :** धनु, **नक्षत्र :** मूळ, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. इ आय टी, **नोकरी/ व्यवसाय :** टी सी एस (पुणे), **वार्षिक उत्पन्न :** ६लाख, **अपेक्षा :** वयात अंतर ३/४वर्ष, उंची ५.८ ते ६, इंजिनिअर, **संपर्क :** ९०७५००३६११/९२२६५९७८८२

*** प्रियांका रजनीकांत कुलकर्णी (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/१०/१९८८, **जन्म वेळ :** पहाटे ३.४३, **जन्म ठिकाण :** बदलापूर, **उंची :** ५.३, **रक्तगट :** बी (+), **गोत्र :** वासिष्ठ, **रास :** मेष, **नक्षत्र :** अश्विनी, **नाडी :** आद्य, **गण :** देव, **शिक्षण :** बी. कॉम, **नोकरी/व्यवसाय :** खाजगी, **वार्षिक उत्पन्न :** २लाख, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ८९९९६०२७९८

*** प्राजक्ता अनिल देवळे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/१०/१९८८, **जन्म वेळ :** सायंकाळी ७.३०, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एम. बी. ए., **नोकरी/व्यवसाय :** अंधेरी (मुंबई), **वार्षिक उत्पन्न :** ७लाख ७०हजार, **अपेक्षा :** अनुरूप, **संपर्क :** ७७३८०६५०२१/८६५३१३३८००

*** मधुरा दुर्गाप्रसाद आकांत (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** २६/०७/१९९९, **जन्म वेळ :** दुपारी ३.३६, **जन्म ठिकाण :** कल्याण, **उंची :** ५.४, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** पुतिमाश, **रास :** धनु, **नक्षत्र :** पूर्वशाढा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** एमटेक गोल्ड मेडलिस्ट, जर्मन भाषा २ लेवल, **नोकरी/ व्यवसाय :** म्यॅरेथॉन, **वार्षिक उत्पन्न :** ५लाख, **अपेक्षा :** अनुरूप, नोकरी मुंबई, पुणे मेट्रो सिटी, परदेश, सी ए/ एम.टेक/ एम. बी. ए/ बी. इ, वयात अंतर जास्त नको, उंची ५.६ ते ६, **संपर्क :** ९८१९२९५८५७

*** अदिती अनिल महाशब्दे (देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख :** ०९/०२/१९९५, **जन्म वेळ :** रात्री १०.४५, **जन्म ठिकाण :** गंगापुर औरंगाबाद, **उंची :** ४.११, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** वृषभ, **नक्षत्र :** रोहिणी, **नाडी :** अंत्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. ए. (ईकोनोमिक्स), **नोकरी/ व्यवसाय :** नाही, **वार्षिक उत्पन्न :** नाही, **अपेक्षा :** स्वत:चे घर असावे, नोकरी किंवा व्यवसाय असल्यास स्थिर झालेला असावा, निर्व्यसनी असावा, **संपर्क :** ९६६५१९५११४

*** मनाली धनंजय सप्रे (कऱ्हाडे ब्राह्मण), जन्म तारीख :** २५/०८/१९९५, **जन्म वेळ :** दुपारी २.५५, **जन्म ठिकाण :** डोंबिवली, **उंची :** ५, **रक्तगट :** एबी (+), **गोत्र :** अत्रि, **रास :** कर्क, **नक्षत्र :** अश्लेषा, **नाडी :** अंत्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** बी. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** डोंबिवली, **वार्षिक उत्पन्न :** २लाख १६हजार, **अपेक्षा :** शक्यतो डोंबिवलीमध्ये राहणारा, समंजस, प्रेमळ, फिरण्याची आवड असणारा, **संपर्क :** ८५९१०१६०३३/ ७०२१९८७३२७

*** गौरी किशोर जोशी (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख :** ०३/१२/२०००, **जन्म वेळ :** सकाळी ९.००, **जन्म ठिकाण :** भुसावळ जि. जळगाव, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** सांकृत्य, **रास :** कूंभ, **नक्षत्र :** धनिष्ठा, **नाडी :** मध्य, **गण :** राक्षस, **शिक्षण :** एम. कॉम, **नोकरी/ व्यवसाय :** एम एन सी परेल(मुंबई), **वार्षिक उत्पन्न : ३लाख ५०हजार, अपेक्षा :** सुशिक्षित/उच्च शिक्षित, सुस्थितीतील, शुद्धशाकाहारी कुटुंब, ठाणे, मुंबई, नवी मुंबई मधील, गौरवर्णीय, वयात १ ते ३ वर्षांचे अंतर असावे, स्थळ श्री बैठकीतील असावे, **संपर्क :** ८५९१०१६०३३/ ७०२१९८७३२७

* **मंजिरी विलास क्षेमकल्याणी (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख :** ११/०१/१९९६, **जन्म वेळ :** सकाळी ९.००, **जन्म ठिकाण :** मुंबई, **उंची :** ५.१, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** भार्गव, **रास :** सिंह, **नक्षत्र :** पूर्वा फाल्गुनी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी.ई. (इलेक्ट्रॉनिक), एम. बी. ए(फायनान्स), **नोकरी/ व्यवसाय :** नवी मुंबई, वाशी, **वार्षिक उत्पन्न :** ८लाख, **अपेक्षा :** उच्चशिक्षित, इंजिनिअर, डॉक्टर, सीए, **संपर्क :** ९८१९७०४४६८

## (घटस्फोटित / पुर्नविवाह)

**वधू पाहिजे ..........**

* **सुश्रुत सुधीर केळकर (कोकणस्थ ब्राह्मण) (Non Consummated Marriage), जन्म तारीख :** १८/०१/१९८६, **जन्म वेळ :** रात्री १२.००, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.३०, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** शांडिल्य, **रास :** मेष, **नक्षत्र :** भरणी, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** MPT, **नोकरी/ व्यवसाय :** कळवा, ठाणे, **वार्षिक उत्पन्न :** १३ ते १४ लाख, **अपेक्षा :** प्रथम किंवा विनापत्य, ग्रॅज्युएट, **संपर्क :** ९८६७१५४७६७/ ९३२४१६७७७३

* **संकेत श्रीकांत लेले (कोकणस्थ ब्राह्मण) (नाममात्र घटस्फोटीत), जन्म तारीख :** २२/०६/१९८९, **जन्म वेळ :** सकाळी ८.४२, **जन्म ठिकाण :** ठाणे, **उंची :** ५.६, **रक्तगट :** ए (+), **गोत्र :** काश्यप, **रास :** मकर, **नक्षत्र :** श्रवण, **नाडी :** अंत्य, **गण :** देव, **शिक्षण :** B/Tech (Bio-Informatics), LLB, LLM, **नोकरी/ व्यवसाय :** बँकेत लीगल मॅनेजर, **वार्षिक उत्पन्न :** १३लाख, **अपेक्षा :** समंजस, उच्च शिक्षित, एकत्र कुटुंबात राहणरी, मनमिळावू, आई वडिलांची जबाबदारी आहे, वडील वकील, आई रेल्वेतुन सेवानिवृत्त **संपर्क :** ९८३३३०२८७८/९८९२१५९८५९

**वर पाहिजे ..........**

* **दीप्ती अनील दीक्षित ( देशस्थ यजूर्वेदी ब्राह्मण) (घटस्फोटित), जन्म तारीख :** ०९/१०/१९८४, **जन्म वेळ :** रात्री १.४५, **जन्म ठिकाण :** सुरत, **उंची :** ५, **रक्तगट :** ओ (+), **गोत्र :** कृष्णात्र्यय, **रास :** मीन, **नक्षत्र :** उत्तरभाद्रपादा, **नाडी :** मध्य, **गण :** मनुष्य, **शिक्षण :** बी. कॉमए **नोकरी/ व्यवसर्ाी :** खाजगी, **वाषिर्क उत्पन्न :** २ लाख १६ हजार, **अपेक्षा :** नोकरी/ व्यवसाय आणि स्वत:चे घर असावे, **संपर्क :** ९३२०४२५७००/९७६८८२०१११

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वत:ची राहील)**


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध.**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# जागतिक महिला दिन : २०२५


















IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
067
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com



गुढी उभारुन आकाशी, बांधून तोरण दाराशी, काढून रांगोळी अंगणी,
हर्ष पेरुणी मनोमनी, करु सुरुवात नव वर्षाची...

**गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...**

# SAMARTH

## URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.

**HEAD OFFICE:** Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum.
**Ph.: 2431357, 2403968, 4202100**

**RC Nagar Branch:** Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161

**Tilakwadi Branch:** Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357

**Shahapur Branch:** 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Belgaum. Ph.: 2431257

**Khanapur Branch:** 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655

**AKSHAY DEPOSIT SCHEME**

| | | | |
|---|---|---|---|
| 46 days to 180 days | 6.00% PA | 2 years | 9.00% PA |
| 181 days to 364 days | 6.50% PA | 3 years | 10.00% PA |
| 1 year | 8.00% PA | | |

Senior Citizen 1% extra*

**NIRANTAR**

| | |
|---|---|
| 1 year | 8% PA |
| 2 years | 9% PA |
| 3 years | 10% PA |

*T&C Apply

**ॲड. अजय ए. सुनाळकर** - चेअरमन **अभय व्ही. जोशी** - व्हा. चेअरमन

....... **संचालक मंडळ** .......

गणपत ए. कुलकर्णी • विनायक जी. जोशी • प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी • मालतेश जी. पाटील • सुनंदा सी. आळतेकर • छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी • उमेश सुणगार • परशुराम एम. कांबळे • अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर - सेक्रेटरी • गौरी एस. बिडी - जन. मॅनेजर

**सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था**

anandads

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

## जागतिक महिला दिन २०२५ - सोलापूर




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH